पिंपरी चिंचवड महानगरपालिका

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल

## सूचना

क्रमांक – नरवि।कावि।२५२२।२०१८

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताथवडे गावाच्या विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ ( १ ) अन्वये महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/ प्र. क्रं.-८४/१५/वि.यो. मंजुरी/नवि-१३, दिनांक -०६/०१/२०१७ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.-टीपीएस-१८१५/२०१२/प्र.क्रं.८४/१५/ई.पी.मंजुरी/नवि-१३ दि.०३/१०/२०१८ नुसार मंजूरी मिळालेली आहे. ( यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली.)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतुन जाणा-या मुंबई-बेंगलोर हमरस्त्यास लागुन असणा-या गावांच्या विकास योजनांमध्ये १२.० मी. चा सर्व्हीस रस्ता मुंबई-बेंगलोर हमरस्त्याच्या दोनही बाजुस दर्शवीला असल्याने , मौजे ताथवडे गावाच्या बाजुस असणा-या वाकड व पुनावळे गावांमधील विकास योजनेतील १२. मी. सर्व्हीस रस्त्यास जोडण्यासाठी मौजे ताथवडे गावास लागुन असणा-या मुंबई-बेंगलोर हमरस्त्याच्या दोनही बाजुस १२.० मी. चा सर्व्हीस रस्ता दर्शवीणे आवश्यक आहे. ( यापुढे " उक्त जमीन " म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा समिती ठराव क्र. २६३, दि . ०६/०९/२०१८. अन्वये पारित केलेल्या ठरावात मौजे ताथवडे येथील मनपाच्या हद्दीतील मुंबई – बॅंगलोर रस्त्यालगत ६०.०० मी रस्त्याच्या दोन्ही बाजुने १२.०० मी चा सर्व्हीस रस्ता प्रस्तावित करण्यास व त्याअनुषंगाने लगत असलेल्या आरक्षणाचे हद्दीत / क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता प्रदान केली आहे. (यापुढे "उक्त ठरावातील विषय" म्हणून संबोधित केलेला.)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त जमीनीमधील मंजूर विकास योजनेतील मुंबई - बेंगलोर ६० मी. रूंद महामार्गालगत १२ मी. सर्व्हीस रस्ता प्रस्तावित करण्यास व लगतच्या आ.क्र. ४३ वाहनतळ, आ.क्र. ३० पोलीस चौकी व स.नं. १३०, १३१ पै. बस टर्मिनल व पार्किंग आरक्षणाचे क्षेत्रात फेरबदल करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ फेरबदलाची कार्यवाही उक्त ठरावातील विषयानुसार करण्याचे योजिले आहे.

( यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून उल्लेख केलेला .)

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – १८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती । सूचना असतील तर त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – १८ यांच्या कायालियाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मुदतीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या हरकती । सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर केला जाईल.

जाहिरात क्रमांक ७८

( श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – १८

ठिकाण- पिंपरी, पुणे – १८.
दिनांक- २८।१२।२०१८

(टिप – सदर सूचना व फेरबदल दर्शक नकाशा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in) या संकेत स्थळावर ही अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

Modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966

NOTICE

No. TPS/WS/25ण/2018

Whereas, the Development Plan for Tathawade village of Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department, vide Notification No.TPS-1815/2012/CR-84/15/S.M/UD-13, dated 06/01/2017 and vide Notification No.TPS-1815/2012/CR-84/15/E.P.Sanction/UD-13, dated 03/10/2018. ( hereinafter referred to as the said Development Plan. )

And whereas, there is 12.0 mtr wide service road along both sides of Mumbai- Bangalore highway in development plans of villages along this highway except Tathawade and therefore it is necessary to propose 12.0 mter wide service road on both sides of this highway in Tathawade which will be in connection with Punáwale and Wakad service road. (hereinafter referred to as the said land)

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed the resolution vide resolution No. 263, date- 06/09/2018 by according sanction to initiate the modification as per the procedure laid down under section 37 of Maharastra Regional and Town Planning Act, 1966, in the said development plan related with the subject to propose 12.0 mtr wide service road along both sides of Mumbai - Bangalore highway and also to modify the boundaries & area of reservation adjacent to this highway getting affected due to this proposal. ( hereinafter referred to as the "said subject of Resolution".)

And whereas, the Municipal corporation now intends to initiate the modification procedure as laid down under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 to to propose 12.0 mtr wide service road along both sides of Mumbai –Banglore highway and to modify area of reservations bearing site no. 43 parking, site no. 30 Police Station, reservation of Bus Terminus & Parking from S.No. 130 & 131 as per the said subject of Resolution, in the said Development Plan ".( hereinafter referred to as the "said Modification".)

And therefore, copy of the said modification is kept open for Public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad , Pimpri, Pune – 411 018.

Any person having any suggestions and / or objections regarding the said modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad , Pimpri, Pune – 411 018, within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government .

The copy of the said modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of the Deputy Director of Town planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune-18.

The suggestions and/or objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the modification proposal to the Government for sanction.

No. 78

Pimpri,
Date-29 /12/2018

(Shravan Hardikar)
Commissioner
Pimpri Chinchwad Municipal Corporation
Pimpri,Pune-18.

(Note: The said Notice & Plan showing Modification proposal is also available on the web site of P.C.M.C - - www.pcmcindia.gov.in)